# महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**

भूखंड क्रं. ८९-८९ अे, पोलीस अधिकारी भोजनगृहाजवळ, सर पोचखानवाला मार्ग,
वरळी, मुंबई - ४०००३०. दुरध्वनी क्र. ०२२-२४९१८३८८/८९, फॅक्स नं.२४९५४१३९.
Web site - www.msphc.org E-mail - os@msphc.org (CIN U45200MH1974SGC017281)


## जाहिरात

अ. महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या नवी मुंबई, पुणे आणि नागपूर क्षेत्रीय कार्यालयांसाठी करारपध्दतीने कार्यकारी अभियंत्यांची नेमणूक करावयाची आहे. त्यासाठी शासकीय सेवेतून (सा.बां. विभागातील उमेदवारास प्राधान्य) कार्यकारी अभियंता पदावरुन सेवा निवृत्त झालेल्या अथवा खालील पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेतः

| | | |
|---|---|---|
| १ | पद संख्या | आवश्यकतेनसूार |
| २) | शैक्षणिक अर्हता | मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियंता पदवी |
| ३) | अनुभव | शासकीय / निमशासकीय सेवेतील सेवा निवृत्त कार्यकारी अभियंत्यांसाठी - कार्यकारी अभियंता पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>अन्य उमेदवारांसाठी - नामांकित बांधकाम व्यवसाय क्षेत्रातील कार्यकारी अभियंता पदावरील किमान ७ वर्षे सेवेचा अनुभव असणे आवश्यक. |
| ४) | शासकीय सेवेतील कामगिरी | सेवा निवृत्त उमेदवारांचा शासकीय सेवेतील सेवाभिलेख अत्युत्कृष्ट असावा तसेच, त्यांच्या विरुध्द कोणतीही शिक्षाविषयक कारवाई झालेली नसावी. |
| ५) | वयोमर्यादा | कमाल - ३५ वर्षे पूर्ण<br>(सेवा निवृत्त शासकीय / निम शासकीय अभियंत्यासाठी वयोमर्यादा ५८ ते ६५ वर्षे) |
| ६) | पारिश्रमिक | रु.६५,०००/- द.म. (सेवा निवृत्त उमेदवारांसाठी शासन निर्णय, सा.प्र.वि. क्रमांक संकिर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७/१२/२०१६ नुसार) |
| ७) | करार तत्वावरील सेवा कालावधी | ११ महिने (करार तत्वावर). |
| ८) | अर्ज करण्याची शेवटची तारीख | १०/०६/२०२२ |

ब. महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या मुंबई, नवी मुंबई, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत चालू असलेल्या प्रकल्पांचे कामकाजासाठी करारपध्दतीने प्रकल्प अभियंत्यांची नेमणूक करावयाची आहे. त्याकरीता खालील पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेतः

| | | |
|---|---|---|
| १ | पद संख्या | आवश्यकतेनसूार |
| २) | शैक्षणिक अर्हता | मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियंता पदवी |
| ३) | अनुभव | नामांकित बांधकाम व्यवसाय क्षेत्रातील निवासी बांधकामे तसेच, अनिवासी बांधकामांवरील प्रकल्प अभियंता पदावरील कामाचा किमान २ वर्ष अनुभव असणे आवश्यक.<br>उमेदवारास संगणकावरील एम.एस. ऑफिस तसेच, इतर अभियांत्रिकी सॉप-टवेअर कामकाजाचे ज्ञान असणे आवश्यक.<br>बांधकाम प्रकल्पाच्या अनुषंगाने बार, PERT चार्ट, अंदाजपत्रके, दर पत्रके तयार करणे. बांधकामाची देयके तयार करणे, देयके तपासणी करणे तसेच, बांधकामाच्या निविदा तयार करणे, निविदा प्रसारित करणे इ. कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक.<br>शासकीय / निमशासकीय कामकाजाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| ४) | वयोमर्यादा | कमाल - ३५ वर्षे पूर्ण<br>(सेवा निवृत्त शासकीय / निम शासकीय अभियंत्यासाठी वयोमर्यादा ५८ ते ६५ वर्षे) |
| ५) | पारिश्रमिक | रु.४०,०००/- द.म. (सेवा निवृत्त उमेदवारांसाठी शासन निर्णय, सा.प्र.वि. क्रमांक संकिर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७/१२/२०१६ नुसार) |
| ६) | करार तत्वावरील सेवा कालावधी | ११ महिने (करार तत्वावर). |
| ७) | अर्ज करण्याची शेवटची तारीख | १०/०६/२०२२ |

सर्वसाधारण सूचना

१. कर्तव्ये व जबाबदाऱ्या : कार्यकारी अभियंता आणि प्रकल्प अभियंता यांच्यासाठी अनुक्रमे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता आणि प्रकल्प अभियंता / कनिष्ठ अभियंता यांच्यावरील कर्तव्ये व जबाबदाऱ्यां प्रमाणे.

२. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

३. उमेदवार महामंडळाच्या वर नमूद क्षेत्रीय कार्यालयाच्या ठिकाणी / परिसरात राहणारा असावा.

४. निवड झालेल्या उमेदवारांना विहीत नमून्यात हमीपत्र द्यावे लागेल.

५. निवड झालेल्या उमेदवारास कराराच्या कालवधीत मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, यांच्या नियंत्रणाखाली अथवा त्यांनी नेमून दिलेल्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली काम करावे लागेल. त्याच्यावर सोपविलेल्या कामकाजाचा अहवाल वेळोवेळी वरिष्ठांना सादर करावा लागेल.

६. वरील प्रमाणे आवश्यक ती अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज दि.१०/०६/२०२२ रोजी संध्याकाळी ५.०० वा. पर्यत सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, वरळी-मुंबई यांचे नावे विहीत नमून्यात सादर करावेत.

७. अर्जाचा नमूना या कार्यालयाचे सांकेतिक स्थळ www.msphc.org वर उपलब्ध आहे.

८. विहीत मुदतीत प्राप्त न झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. तसेच, या संदर्भात केल्या जाणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

९. वरीलप्रमाणे अर्हता व अनुभव नसलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच, अशा अर्जांना कोणतेही उत्तर / प्रतिसाद दिला जाणार नाही.

१०. महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित हे महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ आहे.

११. अधिक चौकशी किंवा माहितीकरिता (०२२-२४९१८३८८/२४९१८३८९) या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा.

१२. पदांची संख्या तसेच, निवड प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक तथा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, वरळी-मुंबई यांना आहेत.

जाहिरात क्र.१/२०२२-२३
दिनांक: ०३/०६/२०२२

**(स्वाक्षरीत)**

**अपर पोलीस महासंचालक तथा सह व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, वरळी-मुंबई**